
# भारत आणि जग

## (नागरिकशास्त्र आणि प्रशासन)

### इयत्ता आठवी





शिक्षणखात्याचा मंजुरी क्रमांक
प्राशिसं/२००९-२०१०/मंजुरी/५०५(१७)/३०५ दिनांक १४.१.२००९

# भारत आणि जग

## (नागरिकशास्त्र आणि प्रशासन)

## इयत्ता आठवी

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,पुणे.

प्रथमावृत्ती : २००९
पुनर्मुद्रण : जुलै २०१०

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे-४११ ००४.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे या पुस्तकाचे सर्व हक्क राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

| | |
|---|---|
| संपादक मंडळ : | प्रा. साधना कुलकर्णी<br>डॉ. श्रीकांत परांजपे<br>श्री. श्रीकांत थावरे<br>श्री. सुभाष तोडकर<br>डॉ. मोहन काशीकर<br>डॉ. बाळ कांबळे<br>श्री. मधुकर नरडे<br>श्री. मोगल जाधव, समन्वयक |
| लेखक : | डॉ. संज्योत आपटे |
| संयोजक : | श्री. मोगल जाधव<br>विशेषाधिकारी, इतिहास व नागरिकशास्त्र<br>पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे. |
| मुखपृष्ठ व सजावट : | श्री. शरद प्रभुदेसाई |
| निर्मिती : | श्री. सच्चितानंद आफळे, मुख्य निर्मिती अधिकारी<br>श्री. राजेंद्र विसपुते, निर्मिती अधिकारी<br>श्री. प्रभाकर परब, निर्मिती सहायक |
| अक्षरजुळणी : | पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे. |
| कागद : | ७० जी.एस.एम. क्रीमव्होव |
| मुद्रणादेश : | 2011-12 |
| मुद्रक : | निट प्रिंटस, एम.आय.डी.सी., अहमदनगर |
| प्रकाशक : | श्री. विवेक उत्तम गोसावी, नियंत्रक<br>पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई-२५. |

# भारताचे संविधान

## प्रास्ताविका

**आम्ही, भारताचे लोक**, भारताचे एक **सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस :

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**
निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करत आहोत.**

# प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्‌ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्‌धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

## प्रस्तावना

'राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००० आणि २००५' अनुसार एन.सी.ई.आर.टी.ने शालेय अभ्यासक्रम बदलला. महाराष्ट्र राज्यात 'प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २००४' अन्वये शालेय अभ्यासक्रम तयार करण्यात आला. या अभ्यासक्रमाची कार्यवाही २००६-२००७ या शालेय वर्षापासून क्रमशः सुरू झाली आहे. अभ्यासक्रमात इतिहास व नागरिकशास्त्र हे विषय इयत्ता तिसरीपासून सुरू करण्यात आले.

अभ्यासक्रमानुसार इयत्ता पाचवीपर्यंत इतिहास व नागरिकशास्त्र या विषयांचा समावेश एकाच पाठ्यपुस्तकात करण्यात आला आहे. इयत्ता सहावी ते आठवी या उच्च प्राथमिक स्तरावर नागरिकशास्त्र आणि प्रशासन या विषयास अभ्यासक्रमात स्वतंत्र स्थान दिले असून शासनमान्य अभ्यासक्रमानुसार मंडळाने इयत्ता आठवीचे प्रस्तुत पाठ्यपुस्तक तयार केले आहे. हे पाठ्यपुस्तक आपल्या हाती देताना आम्हांला आनंद वाटतो.

अध्ययन-अध्यापन प्रक्रिया बालकेंद्रित असावी, स्वयंअध्ययनावर भर दिला जावा, प्राथमिक शिक्षणाच्या अखेरीस विद्यार्थ्यांनी 'विहित क्षमता' प्राप्त कराव्या, अध्ययन व अध्यापन प्रक्रिया आनंददायी व्हावी, असा व्यापक दृष्टिकोन समोर ठेवून हे पुस्तक तयार केले आहे. नागरिकशास्त्राच्या अभ्यासक्रमात प्रथमच भारताचा जगाच्या संदर्भात अभ्यास करण्याचा प्रयत्न होत आहे. प्रस्तुत पाठ्यपुस्तकात आंतरराष्ट्रीय राजकारणाची तोंडओळख, भारताचे परराष्ट्र धोरण, संयुक्त राष्ट्रे व त्यांची कामगिरी, मानवी हक्क आणि जागतिक शांतता रक्षणातील भारताचे कार्य इत्यादी स्वरूपाचे नवीन विषय विद्यार्थ्यांसमोर येत आहेत. हे पाठ्यपुस्तक अद्ययावत माहितीने परिपूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांना जगातील घडामोडी समजावून घेण्यास हे पाठ्यपुस्तक उपयोगी ठरेल. पाठ्यपुस्तकाच्या शेवटी स्पष्टीकरणात्मक टिपा दिल्या आहेत. स्वयंअध्ययन सुलभ होण्यासाठी त्यांचा उपयोग होईल. अध्यापन करताना शिक्षकांनी नागरिकशास्त्र आणि प्रशासन अध्यापनाची उद्दिष्टे व जीवन-कौशल्ये यांची सांगड घालणे अपेक्षित आहे.

पाठ्यपुस्तक जास्तीत जास्त निर्दोष व दर्जेदार व्हावे, या दृष्टीने महाराष्ट्राच्या सर्व भागांतील निवडक शिक्षक, तसेच काही शिक्षणतज्ज्ञ व विषयतज्ज्ञ यांच्याकडून या पुस्तकाचे समीक्षण करण्यात आले. आलेल्या सूचना व अभिप्राय यांचा काळजीपूर्वक विचार करून या पुस्तकाला अंतिम स्वरूप देण्यात आले आहे. संपादक मंडळ, लेखक आणि चित्रकार यांनी अतिशय आस्थेने आणि परिश्रमपूर्वक हे पुस्तक तयार केले आहे. मंडळ या सर्वांचे मन:पूर्वक आभारी आहे.

विद्यार्थी, शिक्षक व पालक या पुस्तकाचे स्वागत करतील, अशी आशा आहे.

(एस. एन. पवार)
**संचालक**
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती
व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

**पुणे**
**दिनांक : १० डिसेंबर २००८**

# अनुक्रमणिका

| क्रमांक | पृष्ठ क्रमांक |
| --- | --- |
| १. परराष्ट्र धोरण | १ |
| २. भारताचे परराष्ट्र धोरण | ५ |
| ३. भारताची सुरक्षा व्यवस्था | ११ |
| ४. संयुक्त राष्ट्रे | १९ |
| ५. संयुक्त राष्ट्रे : कार्य | २७ |
| ६. आंतरराष्ट्रीय सहकार्य व विकास | ३२ |
| ७. मानवी हक्क | ३७ |
| परिशिष्ट | ४२ |

• मलपृष्ठ : संयुक्त राष्ट्रांचे मुख्यालय-न्यूयॉर्क

# १. परराष्ट्र धोरण

मागील वर्षी आपण भारताच्या संविधानाविषयी माहिती घेतली. या वर्षी आपण जगाच्या संदर्भात भारताची भूमिका समजावून घेणार आहोत. अन्य राष्ट्रांशी राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व्यवहार करताना आपल्याला काही हेतू साध्य करायचे असतात. असे व्यवहार काही नियमांवर आधारलेले असतात व त्यांचा समावेश परराष्ट्र धोरणात असतो. या पाठात आपण परराष्ट्र धोरणाचा अर्थ व त्यावर परिणाम करणाऱ्या घटकांविषयी माहिती घेणार आहोत. अर्थात त्यासाठी आपणांस काही महत्त्वाच्या संकल्पनांचा अर्थ माहिती असला पाहिजे, कारण राष्ट्राराष्ट्रांमधील संबंधांचे आकलन होण्यासाठी त्या संकल्पना महत्त्वाच्या आहेत.

**सार्वभौम राष्ट्र म्हणजे काय? :** जगात अनेक लहान-मोठे देश आहेत. प्रत्येक देशाला स्वतःचा निश्चित भूप्रदेश असतो. त्यात राहणारे लोक हे त्या देशाचे नागरिक असतात. सार्वभौम राष्ट्राला आपल्या प्रदेशात राहणाऱ्या लोकांच्या कल्याणासाठी योग्य निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य असते. बाह्य नियंत्रण नसणाऱ्या व अंतर्गत क्षेत्रात सर्वश्रेष्ठ असणाऱ्या, स्वतंत्रपणे आपला कारभार करणाऱ्या देशांना 'सार्वभौम' म्हटले जाते. या अर्थाने भारत हे एक सार्वभौम राष्ट्र आहे.

**परस्परावलंबन :** जगातील कोणतेच राष्ट्र सर्वार्थाने स्वयंपूर्ण नसते. गरीब, श्रीमंत, तसेच विकसित, विकसनशील असे सर्वच देश एकमेकांवर वेगवेगळ्या कारणांसाठी अवलंबून असतात. याला परस्परावलंबन म्हणतात. राष्ट्राराष्ट्रांमधील परस्परावलंबन मैत्रीच्या संबंधांवर आधारलेले असणे सर्वांच्याच हिताचे असते.

जगात शांतता असणे, सर्वांना सुरक्षित वाटणे, राष्ट्राराष्ट्रांमधील संबंध सहकार्याचे व सामंजस्याचे असणे आणि त्यांच्यात मैत्रीपूर्ण संबंध असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. जागतिक शांतता व सुरक्षितता असेल, तर प्रत्येक देशाला आपल्या जनतेच्या विकासासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करता येईल.

**राष्ट्रीय हित :** आपल्या देशाच्या सार्वभौमत्वाचे जतन करणे, आर्थिक विकासाला प्राधान्य देणे व परराष्ट्रसंबंधांतील आपले हित जपणे याला 'राष्ट्रीय हित' असे म्हणतात. राष्ट्राराष्ट्रांमध्ये राजकीय, आर्थिक, व्यापारविषयक, सांस्कृतिक इत्यादी प्रकारचे संबंध असतात. अन्य राष्ट्रांशी कोणतेही व्यवहार करताना आपल्या देशाच्या स्वातंत्र्यावर गदा येणार नाही, याची काळजी राष्ट्रांना घ्यावी लागते.

**परराष्ट्र धोरण :** परराष्ट्र धोरण म्हणजे राष्ट्रहिताच्या जोपासनेसाठी व संवर्धनासाठी अन्य राष्ट्रांशी करायच्या व्यवहारांविषयीचे धोरण होय. प्रत्येक राष्ट्र, परराष्ट्र धोरणाची एक चौकट निश्चित करून त्यातील तत्त्वांनुसार अन्य राष्ट्रांशी कसे व कोणते व्यवहार करायचे याविषयी निर्णय घेते.

## परराष्ट्र धोरणावर परिणाम करणारे घटक

कोणत्याही देशाच्या परराष्ट्र धोरणावर परिणाम करणारे अनेक घटक असतात. त्यांतील काही घटकांची माहिती आपण येथे घेणार आहोत.

**भौगोलिक स्थान :** देशाचा आकार, प्राकृतिक रचना, नैसर्गिक साधनसंपत्ती आणि भौगोलिक स्थान यांचा परिणाम परराष्ट्र धोरणावर होतो. भारताच्या वैशिष्ट्यपूर्ण भौगोलिक स्थानामुळे भारताला अनेक शेजारी राष्ट्रे लाभली आहेत. त्यामुळे परराष्ट्र धोरणाची आखणी करताना या शेजारी राष्ट्रांचा विचार करावा लागतो.



The territorial waters of India extend into the sea to a distance of twelve nautical miles measured from the appropriate base lineBased upon Survey of India map with the permission of the surveyor General of India.

© Government of India copyright 2009.

**लोकसंख्या :** परराष्ट्र धोरणावर परिणाम करणारा दुसरा महत्त्वाचा घटक म्हणजे लोकसंख्या होय. लोकसंख्या कमी असणाऱ्या देशांना आपल्या साधनसामग्रीचा उपयोग विकासासाठी करण्यात मनुष्यबळ कमी पडते. याउलट लोकसंख्या जास्त असणाऱ्या देशांना नागरिकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यावर लक्ष द्यावे लागते. त्यामुळे त्यांचे अन्य राष्ट्रांवरील परावलंबन वाढते. स्वतंत्रपणे परराष्ट्र धोरण आखण्यात त्यामुळे अडचण येऊ शकते. अर्थात लोकसंख्या कमी असो वा जास्त, उद्यमशील, चारित्र्यवान, प्रामाणिक असे नागरिक राष्ट्राचे सामर्थ्य वाढवण्यास कारणीभूत ठरतात.

**लष्करी सामर्थ्य :** ज्या देशांचे लष्कर प्रबळ आणि अत्याधुनिक असते असे देश जगात महासत्ता म्हणून आकारास येतात. महासत्तांच्या परराष्ट्र धोरणांचा परिणाम अन्य राष्ट्रांवर होतो. लष्करीदृष्ट्या दुबळ्या राष्ट्रांच्या स्वतंत्र परराष्ट्र धोरण आखण्यावर मर्यादा येतात.

**अर्थव्यवस्था :** अर्थव्यवस्था आणि स्वतंत्र परराष्ट्र धोरण यांचा निकटचा संबंध आहे. भक्कम अर्थव्यवस्था, आंतरराष्ट्रीय व्यापारात निर्णायक स्थान, आर्थिक स्वावलंबन इत्यादी बाबींचा परराष्ट्र धोरणावर परिणाम होतो. ज्या राष्ट्रांची अर्थव्यवस्था विकसित असते, असे देश अन्य राष्ट्रांवर कमी अवलंबून असतात. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे परराष्ट्र धोरणावरील आर्थिक घटकांचा प्रभाव वाढला आहे.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) प्रत्येक देशाला स्वत:चा निश्चित ................. असतो.

(आ) राष्ट्राराष्ट्रांमधील ................. मैत्रीच्या संबंधांवर आधारलेले असणे सर्वांच्याच हिताचे असते.

(इ) अर्थव्यवस्था आणि स्वतंत्र ................. धोरण यांचा निकटचा संबंध आहे.

२. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) सार्वभौम राष्ट्राला कोणता निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य असते ?

(आ) राष्ट्राराष्ट्रांमध्ये कोणत्या प्रकारचे संबंध असतात ?

(इ) राष्ट्राचे सामर्थ्य वाढवण्यास नागरिकांचे कोणते गुण कारणीभूत ठरतात ?

३. **दोन-तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) सार्वभौम देश कोणत्या देशाला म्हटले जाते ?

(आ) राष्ट्रीय हित म्हणजे काय ?

### उपक्रम

(अ) परराष्ट्र धोरणावर परिणाम करणाऱ्या घटकांचा तक्ता तयार करा.

(आ) जगाच्या नकाशात भारताचे शेजारी राष्ट्रे दाखवा.

# २. भारताचे परराष्ट्र धोरण

मागील प्रकरणात आपण परराष्ट्र धोरणाचा अर्थ व त्यावर परिणाम करणारे घटक यांविषयी माहिती घेतली. या पाठात आपण आपल्या देशाच्या परराष्ट्र धोरणाची पार्श्वभूमी व वैशिष्ट्ये समजावून घेणार आहोत.

**भारताचे परराष्ट्र धोरण–पार्श्वभूमी :** आपल्या प्राचीन इतिहासातील शांतता व सहिष्णुता यांचा प्रभाव भारताच्या परराष्ट्र धोरणावर आहे. भारतीय संस्कृतीतील 'वसुधैव कुटुंबकम्' म्हणजे संपूर्ण जग हे जणू एक कुटुंबच आहे, ही शिकवण आपल्या परराष्ट्र धोरणातून व्यक्त होते. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातून पुढे आलेल्या आंतरराष्ट्रीय शांतता व सामंजस्य यांचाही प्रभाव आपल्या परराष्ट्र धोरणावर आहे.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. एक स्वतंत्र राष्ट्र म्हणून भारताला स्वतःचे परराष्ट्र धोरण ठरवणे आवश्यक होते. भारताच्या परराष्ट्र धोरणाची रूपरेषा स्वातंत्र्यपूर्व काळातच ठरवण्यात आली होती. त्यात पुढील मुद्द्यांचा समावेश होता–

(१) वसाहतवादाला विरोध करणे.
(२) शांतताप्रिय देशांशी सहकार्य करणे.
(३) वंश किंवा वर्णावर आधारित भेदभावास विरोध करणे.
(४) अन्य देशांतील स्वातंत्र्य चळवळींना पाठिंबा देणे.
(५) जागतिक शांततेसाठी प्रयत्न करणे.

७ सप्टेंबर १९४६ रोजी पंडित जवाहरलाल नेहरू यांनी हंगामी सरकारचे प्रमुख या नात्याने केलेल्या भाषणात भारताच्या परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे स्पष्टपणे मांडली होती. अन्य राष्ट्रांच्या दबावाला

बळी न पडता स्वतंत्र परराष्ट्र धोरणाची आखणी करण्यावर त्यांनी भर दिला होता.

**भारताचे परराष्ट्र धोरण-संविधानातील तरतूद** : स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताने आपले स्वतःचे असे एक स्वतंत्र परराष्ट्र धोरण आखण्यास सुरुवात केली. आपल्या देशाच्या स्वातंत्र्याचे रक्षण करणे आणि प्रादेशिक अखंडता जपणे ही आपल्या परराष्ट्र धोरणाची मूलभूत उद्‌दिष्टे आहेत. भारताच्या संविधानात आपले आंतरराष्ट्रीय संबंध व व्यवहार कसे असावेत, याचे मार्गदर्शन अनुच्छेद ५१ अनुसार करण्यात आले आहे. या अनुच्छेदात भारताच्या परराष्ट्र धोरणाची तत्त्वे दिली असून आपल्या परराष्ट्र धोरणातून पुढील बाबी साध्य करायच्या आहेत.

(१) भारताने आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षिततेस प्राधान्य द्यावे.
(२) राष्ट्राराष्ट्रांत न्याय्य व सन्मानाचे संबंध प्रस्थापित करावे.
(३) आंतरराष्ट्रीय कायद्याचा आदर करावा.
(४) आपले आंतरराष्ट्रीय प्रश्न शांततेने व लवादामार्फत सोडवण्यास प्रोत्साहन द्यावे.


भारताच्या परराष्ट्र धोरणाची काही ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

**साम्राज्यवाद व वसाहतवादास विरोध** : साम्राज्यवाद जोपासणे म्हणजे अन्य देशांच्या स्वातंत्र्याचा व सार्वभौमत्वाचा अनादर करणे, आपल्या राष्ट्रहिताच्या जोपासनेसाठी अन्य राष्ट्रांवर विविध मार्गांनी प्रभुत्व निर्माण करणे होय. वसाहतवाद हा साम्राज्यवादाचाच एक प्रकार आहे. आपल्या सामर्थ्याच्या जोरावर काही देश दुसऱ्या देशाचे भूप्रदेश जिंकून तेथे आपले प्रभुत्व प्रस्थापित करतात. याला वसाहतवाद म्हणतात. साम्राज्यवाद व वसाहतवादास विरोध करणे, हे भारताच्या परराष्ट्र धोरणाचे वैशिष्ट्य आहे.

**आंतरराष्ट्रीय शांततेची जोपासना :** भारत शांततेच्या तत्त्वांशी वचनबद्ध आहे. आपले सर्व आंतरराष्ट्रीय प्रश्न वाटाघाटीच्या, संवादाच्या मार्गाने सोडवण्यावर भारताचा भर आहे. भारताच्या शांततेच्या धोरणाचे स्वरूप विधायक आहे. शांततेचे धोरण अवलंबणे म्हणजे निष्क्रिय राहणे नव्हे, तर जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी ठोस प्रयत्न करणे होय. आंतरराष्ट्रीय शांततेची जोपासना हा भारताच्या परराष्ट्र धोरणाचा गाभा आहे.

**मैत्रीपूर्ण संबंध जोपासण्यावर भर :** जगातल्या सर्व देशांशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवणे, हे भारताच्या परराष्ट्र धोरणाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. मैत्रीपूर्ण संबंधांमुळे सांस्कृतिक, शैक्षणिक व आर्थिक देवाणघेवाण वाढते. भारताने अन्य राष्ट्रांच्या विकासाला मदत करून मैत्रीपूर्ण संबंध जोपासण्यावर भर दिला आहे.

**पंचशील तत्त्वे :** पंचशील तत्त्वे ही भारताच्या परराष्ट्र धोरणाचा प्रमुख आधारस्तंभ होय. आंतरराष्ट्रीय प्रश्न शांततेच्या मार्गाने सोडवण्यासाठीची ती एक नियमावली आहे. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी पंचशील तत्त्वे १९५४ साली अधिकृतपणे मांडली. त्यातील पाच तत्त्वे पुढीलप्रमाणे –



पं. जवाहरलाल नेहरू

(१) एकमेकांच्या प्रादेशिक अखंडत्वाचा व सार्वभौमत्वाचा आदर करणे.

(२) अन्य देशांवर आक्रमण न करणे.

(३) अन्य देशांच्या अंतर्गत बाबींमध्ये ढवळाढवळ न करणे.

(४) समानता आणि परस्परांचा लाभ होईल, असे धोरण अवलंबणे.

(५) शांततामय सहजीवन.

कोणत्याही देशाने अन्य देशांवर कोणत्याही प्रकारचा दबाव आणू नये. तसेच वैचारिक, राजकीय, आर्थिक इत्यादी बाबतीत हस्तक्षेप करू नये अशी अपेक्षा पंचशील तत्त्वांमधून व्यक्त होते.

**अलिप्ततावाद** : अलिप्तता म्हणजे तटस्थ किंवा अलग असणे नव्हे. भारताचे परराष्ट्र धोरण या अर्थाने अलिप्त नाही. दुसऱ्या महायुद्धानंतर सोविएत युनियन आणि अमेरिका या दोन महासत्ता उदयास आल्या. त्यांच्यातील तणावपूर्ण संबंधाला 'शीतयुद्ध' म्हटले जाते. शीतयुद्धादरम्यान जगात एक अविश्वासाचे व तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. सोविएत युनियन व अमेरिका हे दोन्ही देश नव्याने स्वतंत्र होणाऱ्या देशांना आपापल्या गटात खेचण्याचा प्रयत्न करत होते. भारत अशा कोणत्याच गटात सामील होणार नाही, कारण भारताला कोणाचेच प्रभुत्व नको, पण सर्वांचे सहकार्य पाहिजे अशी भूमिका पंडित जवाहरलाल नेहरू यांनी घेतली. शीतयुद्धाच्या संदर्भात भारताने घेतलेल्या स्वतंत्रतेच्या व शांततेच्या या भूमिकेला 'अलिप्ततेचे धोरण' असे म्हणतात. अलिप्ततावाद हे भारताच्या परराष्ट्र धोरणाचे आणखी एक उल्लेखनीय वैशिष्ट्य होय.

**अलिप्ततावादी चळवळ** : दुसऱ्या महायुद्धानंतर आशिया व आफ्रिका खंडातील नव्याने स्वतंत्र झालेल्या देशांनी अलिप्ततेच्या विचाराला पाठिंबा दिला व ती एक महत्त्वपूर्ण चळवळ झाली. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू, युगोस्लाव्हियाचे अध्यक्ष

मार्शल टिटो, इजिप्तचे अध्यक्ष गमाल अब्दुल नासेर, इंडोनेशियाचे राष्ट्राध्यक्ष सुकार्नो आणि घानाचे पंतप्रधान क्वामे नक्रुमा यांच्या नेतृत्वाखाली या चळवळीची सुरुवात सन १९६१ पासून झाली.

**अलिप्ततावादी चळवळीचे मूल्यमापन :** अलिप्ततावादी चळवळीने वसाहतवाद, साम्राज्यवाद आणि वंशवाद याला विरोध केला आहे. आंतरराष्ट्रीय प्रश्न शांततामय मार्गाने सोडवण्यास या चळवळीने प्रोत्साहन दिले आहे. पंडित जवाहरलाल नेहरूंच्या मार्गदर्शनाखाली भारताने या चळवळीचे नेतृत्व केले. त्यानंतरच्या काळातही या चळवळीला भारताने सक्रिय पाठिंबा दिला आहे. शीतयुद्ध संपुष्टात आले तरीही या चळवळीचे महत्त्व कमी झाले नाही.

मानवतावाद, जागतिक शांतता व समानता या शाश्वत मूल्यांवर अलिप्ततावादी चळवळ आधारलेली आहे. या चळवळीने अल्पविकसित राष्ट्रांना एकत्र येण्यास प्रेरित केले. तसेच अशा राष्ट्रांना आंतरराष्ट्रीय राजकारणात सन्मानाने उभे राहण्याचा एक नवा विश्वास दिला.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी कंसातील योग्य पर्याय लिहा.**

(अ) साम्राज्यवाद व वसाहतवादास विरोध करणे, हे ............ परराष्ट्र धोरणाचे वैशिष्ट्य आहे.
(भारताच्या, अमेरिकेच्या, इंग्लंडच्या)

(आ) पंचशील तत्त्वे १९५४ साली .................. यांनी अधिकृतपणे मांडली.
(पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ. राजेंद्र प्रसाद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर)

२. 'अ' गट व 'ब' गट यांच्या योग्य जोड्या लावा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (अ) युगोस्लाव्हियाचे अध्यक्ष | (१) पंडित जवाहरलाल नेहरू |
| (आ) इजिप्तचे अध्यक्ष | (२) मार्शल टिटो |
| (इ) इंडोनेशियाचे राष्ट्राध्यक्ष | (३) गमाल अब्दुल नासेर |
| (ई) घानाचे पंतप्रधान | (४) सुकार्नो |
| | (५) क्वामे नख्रुमा |

३. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.

(अ) भारताच्या संविधानात अनुच्छेद ५१ अनुसार कोणते मार्गदर्शन केले आहे ?

(आ) अलिप्ततावादी चळवळीने कोणत्या गोष्टींना विरोध केला आहे ?

(इ) अलिप्ततावादी चळवळ कोणत्या मूल्यांवर आधारलेली आहे ?

४. दोन-तीन वाक्यांत उत्तरे लिहा.

(अ) भारताच्या परराष्ट्र धोरणाची कोणती उद्दिष्टे आहेत ?

(आ) भारताच्या परराष्ट्र धोरणाची पंचशील तत्वे कोणती आहेत ?

(इ) अलिप्ततावादी चळवळीने अल्पविकसित राष्ट्रांना कोणता विश्वास दिला ?

**उपक्रम**

(अ) पंचशील तत्वे मोठ्या अक्षरांत लिहून त्यांचा अर्थ शिक्षकांच्या मदतीने समजावून घ्या.

(आ) 'अलिप्ततावादी चळवळ' या विषयावर शिक्षकांच्या मदतीने वर्गात चर्चासत्र आयोजित करा.

# ३. भारताची सुरक्षा व्यवस्था

मागील पाठात आपण भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास केला. या पाठात आपण भारताच्या सुरक्षा व्यवस्थेची माहिती घेणार आहोत.

विविध राष्ट्रांमध्ये जेव्हा संघर्ष निर्माण होतात, तेव्हा त्या राष्ट्रांच्या भौगोलिक अखंडतेला आणि सार्वभौमत्वाला धोके निर्माण होतात. राष्ट्रांमधील संघर्षांचे निराकरण शांततेच्या मार्गाने झाले नाही, तर त्यातून युद्धाचाही धोका निर्माण होऊ शकतो, म्हणून कोणत्याही परिस्थितीत आपल्या राष्ट्राच्या अस्तित्वाचे, ऐक्याचे आणि सार्वभौमत्वाचे रक्षण करणे अत्यंत महत्त्वाचे असते. त्यासाठी प्रत्येक राष्ट्राला आपली सेनादले सुसज्ज ठेवावी लागतात. सेनादलांना मदत करण्यासाठी निमलष्करी दले तयार ठेवावी लागतात. देशाचे संरक्षण करणारी यंत्रणा व व्यवस्था अद्ययावत असावी लागते. राष्ट्राची सुरक्षा अबाधित ठेवण्याच्या या उपाययोजनांना 'राष्ट्रीय सुरक्षा' म्हणतात.

देशाचे संरक्षण ही त्या देशातील शासनाची जबाबदारी असते व त्या कार्यात सहभागी होणे ही नागरिकांची जबाबदारी असते. देशाची सुरक्षा व्यवस्था बळकट असेल, तर देशाच्या विकासाला पोषक वातावरणही तयार होते.


**भारताच्या सुरक्षा व्यवस्थेचे स्वरूप :** भारताच्या सुरक्षा व्यवस्थेत सेनादलांचा आणि संरक्षणाशी संबंधित संस्थांचा समावेश होतो. भूदल, नौदल आणि वायुदल या तीन दलांचे मिळून भारतीय लष्कर तयार होते. या तिन्ही सेनादलांची मुख्यालये नवी दिल्ली येथे आहेत.

भारताच्या सुरक्षा व्यवस्थेच्या सर्वोच्चपदी भारताचे राष्ट्रपती

असतात. भारताचे राष्ट्रपती हे भूदल, नौदल व वायुदल या तीनही संरक्षण दलांचे सरसेनापती असतात. पंतप्रधान मंत्रिमंडळाच्या सल्ल्याने आपले संरक्षणविषयक धोरण ठरवतात.

संरक्षण हा विषय संघसूचीत असल्याने संघशासनाला संरक्षणविषयक बाबींमध्ये निर्णय घेण्याचा अधिकार असतो. संघशासनाचे संरक्षण खाते संरक्षणाशी निगडित असणारी सर्व कामे करते. या खात्याच्या प्रमुखाला 'संरक्षण मंत्री' म्हणतात. राजकीय व्यवहार समिती, राष्ट्रीय सुरक्षा समिती, राष्ट्रीय सुरक्षा परिषद या तीन यंत्रणा शासनाला संरक्षणविषयक बाबींमध्ये निर्णय घेण्यास मदत करतात.

**भूदल :** भारताच्या भौगोलिक सीमांचे संरक्षण करणे हे भूदलाचे प्रमुख काम आहे. भूदलामध्ये पायदळ, रणगाडा दल, तोफखाना दल यांचा समावेश होतो. भूदलाच्या प्रमुखाला 'जनरल' असे म्हणतात.



रणगाडा

**नौदल :** भारताला सुमारे ७५१७ किलोमीटर लांबीचा समुद्रकिनारा लाभला आहे. या सागरी सीमांचे रक्षण करण्याची जबाबदारी भारतीय



लढाऊ बोट

नौदलावर आहे. नौदलाच्या प्रमुखाला 'ॲडमिरल' असे म्हणतात.

**वायुदल :** भारताच्या हवाई सीमांचे व अवकाशाचे रक्षण करण्याची जबाबदारी वायुदलाची असते. वायुदलाच्या प्रमुखाला 'एअर चीफ मार्शल' असे म्हणतात.



लढाऊ विमान

या तीनही सेनादलांच्या प्रमुखांची नियुक्ती राष्ट्रपतींकडून केली जाते.

**प्रशिक्षण संस्था :** भारताची सुरक्षा व्यवस्था भक्कम व बळकट करण्यासाठी सेनाधिकाऱ्यांना व जवानांना प्रशिक्षण दिले जाते.

प्रशिक्षणामुळे त्यांचा आत्मविश्वास व कार्यक्षमता वाढते. संरक्षण कार्याशी संबंधित कौशल्ये आत्मसात करण्याची संधी प्रशिक्षण काळात मिळते. ध्येयनिष्ठा, देशाभिमान, सांघिक वृत्ती अशा अभिवृत्तींचा परिपोष हे प्रशिक्षणाचे फायदे असतात. भारताच्या लष्करी सेवेमध्ये महिलांना आता अनेक संधी उपलब्ध आहेत.

सेनाधिकाऱ्यांना व जवानांना प्रशिक्षित करण्यासाठी अनेक प्रशिक्षण संस्था कार्यरत आहेत. पुणे येथील नॅशनल डिफेन्स ॲकॅडमी, डेहराडून येथील इंडियन मिलिटरी ॲकॅडमी, दिल्ली येथील नॅशनल डिफेन्स कॉलेज या त्यांपैकी काही महत्त्वाच्या प्रशिक्षण संस्था आहेत.

**निमलष्करी दले :** देशाच्या अंतर्गत भागात सुरक्षितता राखण्यासाठी, सागरी किनारपट्टी सुरक्षित ठेवण्यासाठी व सेनादलांना सहकार्य देण्यासाठी असलेल्या सेनेला 'निमलष्करी दले' असे म्हणतात. निमलष्करी दलांत सीमा सुरक्षा दल (Border Security Force), तटरक्षक दल (Coast Guard), केंद्रीय राखीव पोलीस दल (Central Reserve Police Force), जलद कृती दल (Rapid Action Force) इत्यादींचा समावेश होतो. रेल्वे स्थानके, तेलसाठे, पाणीसाठे इत्यादी महत्त्वाच्या ठिकाणांचे संरक्षण करण्याची जबाबदारी निमलष्करी दलांची असते. तसेच नैसर्गिक किंवा मानवनिर्मित आपत्तींचे व्यवस्थापन करण्यात त्यांचा सहभाग असतो. शांततेच्या काळात देशाच्या आंतरराष्ट्रीय सीमांचे रक्षण करण्याची जबाबदारी निमलष्करी दलांवर असते.

सीमेजवळच्या भागात राहणाऱ्या नागरिकांच्या मनात सुरक्षिततेची भावना निर्माण करणे, तस्करी रोखणे, सीमेवर गस्त घालणे ही कामे सीमा सुरक्षा दल करते.

भारताच्या सागरी किनाऱ्यांचे रक्षण करण्यासाठी तटरक्षक दलाची निर्मिती करण्यात आली आहे. भारताच्या सागरी हद्दीतील मच्छीमारी व्यवसायास संरक्षण देणे, सागरी मार्गावरील चोरटा व्यापार थांबवणे इत्यादी कामे तटरक्षक दल पार पाडते.

कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या कामी विविध राज्यांतील प्रशासनास मदत करण्याचे काम केंद्रीय राखीव पोलीस दल करते.

बॉंबस्फोट, दंगे यांमुळे देशाच्या सुरक्षेस धोका निर्माण झाल्यास वेगवान हालचाली करून जनजीवन सुरळीत करण्याचे काम जलद कृती दल करते.

विद्यार्थ्यांमध्ये शिस्त व लष्करी शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी या हेतूने राष्ट्रीय छात्रसेना म्हणजेच 'नॅशनल कॅडेट कोर'ची (एन. सी. सी.) स्थापना करण्यात आली आहे. यात शाळा, महाविद्यालयांतील विद्यार्थी-विद्यार्थिनींना सहभागी होता येते.

**गृहरक्षक दल :** स्वातंत्र्यपूर्व काळात गृहरक्षक दल (होमगार्ड) ही संघटना स्थापन करण्यात आली. गृहरक्षक दलात सहभागी होऊन नागरिक देशाच्या संरक्षणास साहाय्यभूत ठरू शकतात. वीस ते पस्तीस वर्षे वयोगटातील कोणत्याही स्त्री-पुरुष नागरिकांस या दलात भरती होता येते.

पोलिसांच्या बरोबरीने सार्वजनिक सुरक्षितता राखणे, दंगल व बंद या काळात दूध, पाणी इत्यादी जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करणे, वाहतुकीची व्यवस्था करणे, भूकंप, पूर अशा नैसर्गिक आपत्तींच्या वेळी लोकांना मदत करणे इत्यादी कामे या दलास पार पाडावी लागतात.

**नागरिक आणि संरक्षण :** युद्धातील हवाई हल्ल्यांमुळे व

क्षेपणास्त्रांच्या वापरामुळे शहरेच्या शहरे उद्ध्वस्त होऊ शकतात. वाहतुकीचे मार्ग, धरणे, पूल नष्ट होतात. यामुळे नागरी जीवनच उद्ध्वस्त होते. अशा वेळी नागरिकांनी हवालदिल होता कामा नये किंवा आपले मनोधैर्य खचू देता कामा नये, कारण त्यांच्या मनोधैर्यावर व सहकार्यावर सैन्याचे सामर्थ्य अवलंबून असते. आपल्या सैन्याला पाठबळ देऊन नागरिक फार मोठ्या प्रमाणात देशाच्या संरक्षणास सहकार्य करू शकतात. देशाचे संरक्षण करणे हे आपले एक मूलभूत कर्तव्य आहे. त्यासाठी नागरिकांनी नागरी संरक्षण, प्रथमोपचार यांसारख्या बाबींचे प्रशिक्षण घेतले, तर आपत्तीच्या काळात ते देशाच्या संरक्षणाची जबाबदारी उचलू शकतात.

आपत्तीच्या काळात कोणती सावधानता बाळगली पाहिजे, याची प्राथमिक माहिती नागरिकांना असणे आवश्यक आहे. अशा प्रसंगांमध्ये साठेबाजी, काळाबाजार, लूटमार इत्यादींसारख्या अपप्रवृत्ती डोके वर काढतात. नागरिकांनी अशा वेळी त्यांच्या विरोधात खंबीरपणे उभे राहिले पाहिजे. नागरिकांचे असे सहकार्य लाभले, तर देशाची सुरक्षा अबाधित राहू शकते. शेवटी लष्कराचे शौर्य, धैर्य, सामर्थ्य आणि नागरिकांचा त्यांना मिळणारा सहयोग यांवरच राष्ट्राची सुरक्षा अवलंबून आहे. नागरिकांनी याचे सतत भान ठेवले पाहिजे.

**भारताच्या सुरक्षिततेपुढील आव्हाने** : स्वातंत्र्योत्तर काळात बाह्य शक्तींनी भारताच्या सुरक्षिततेला धोका निर्माण करण्याचा प्रयत्न केला. पाकिस्तान व भारत या दोन देशांत १९४७-४८, १९६५, १९७१ आणि १९९८ मध्ये युद्धाचे प्रसंग निर्माण झाले होते. १९६२ मध्ये चीनने भारतावर आक्रमण केले होते. आजही भारत आणि पाकिस्तान

या दोन देशांच्या दरम्यान अनेक वादग्रस्त प्रश्न आहेत. उदाहरणार्थ, काश्मीरचा प्रश्न, पाणीवाटपाविषयीचा तंटा, घुसखोरीची समस्या इत्यादी. चीनबरोबर असणारा सीमावाद भारताच्या सुरक्षिततेला आव्हान देणारा आहे. असे असले तरीही शेजारी राष्ट्रांबरोबर असणारे वाद शांततेच्या मार्गाने सोडवण्यात भारताने पुढाकार घेतला आहे.

आज दहशतवाद हे भारताच्या सुरक्षिततेपुढील सर्वांत मोठे आव्हान असून दहशतवादाचे उच्चाटन व्हावे, म्हणून आपला देश प्रयत्नशील आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर दहशतवाद नष्ट व्हावा म्हणून जे प्रयत्न होत आहेत त्यांस भारत पाठिंबा देत आहे.

भारतात भाषिक, धार्मिक, प्रादेशिक विविधता आहे. त्यांतून आपण एकात्मता जोपासली आहे. या एकात्मतेचे जतन व संवर्धन आपण केले पाहिजे. आपल्या धार्मिक व प्रादेशिक अस्मिता जपताना देशाच्या ऐक्य व एकात्मतेला धोका निर्माण होणार नाही याची काळजी घेणे, ही नागरिक म्हणून आपली जबाबदारी आहे.

## स्वाध्याय

१. रिकाम्या जागी कंसातील योग्य पर्याय लिहा.

(अ) भारताच्या सुरक्षा व्यवस्थेच्या सर्वोच्चपदी.......असतात.
(राष्ट्रपती, पंतप्रधान, संरक्षण मंत्री)

(आ) संरक्षण हा विषय ............... असल्याने संघशासनाला संरक्षण-विषयक बाबींमध्ये निर्णय घेण्याचा अधिकार असतो.
(राज्यसूचीत, संघसूचीत, समवर्तीसूचीत)

(इ) भारताच्या सागरी किनाऱ्यांचे रक्षण करण्यासाठी ........... निर्मिती करण्यात आली आहे.
(तटरक्षक दलाची, सीमा सुरक्षा दलाची, जलद कृती दलाची)

२. 'अ' गट व 'ब' गट यांच्या योग्य जोड्या लावा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (अ) नॅशनल डिफेन्स अॅकॅडमी | (१) दिल्ली |
| (आ) इंडियन मिलिटरी अॅकॅडमी | (२) पुणे |
| (इ) नॅशनल डिफेन्स कॉलेज | (३) डेहराडून |
| | (४) नाशिक |

३. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.

(अ) भूदलाचे प्रमुख काम कोणते आहे ?

(आ) केंद्रीय राखीव पोलीस दल कोणते काम करते ?

(इ) राष्ट्रीय छात्रसेनेची स्थापना का करण्यात आली ?

४. दोन-तीन वाक्यांत उत्तरे लिहा.

(अ) सेनादले सुसज्ज का ठेवावी लागतात ?

(आ) सीमा सुरक्षा दल कोणते काम करते ?

(इ) जलद कृती दल कोणते काम करते ?

### उपक्रम

(अ) भारतीय लष्करात पराक्रम गाजवणाऱ्या जवानांना दिल्या जाणाऱ्या शौर्य-पदकांची माहिती संकलित करा.

(आ) भूदल, नौदल, वायुदल यांतील अद्ययावत शस्त्रसामग्रीविषयी माहिती संकलित करून त्यांचा उपयोग केव्हा केला जातो ते समजावून घ्या. त्याआधारे प्रदर्शन भरवा.

(इ) लष्करी सेवेत विशेष कामगिरी केलेल्या महिलांविषयी माहिती संकलित करा.

# ४. संयुक्त राष्ट्रे

भारताच्या सुरक्षा व्यवस्थेचे स्वरूप मागील पाठात आपण समजावून घेतले. जागतिक शांततेसाठी प्रयत्नशील असलेल्या 'संयुक्त राष्ट्रे' या आंतरराष्ट्रीय संघटनेची ओळख आपण या पाठात करून घेणार आहोत.

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात दोन महायुद्धे झाली. या महायुद्धांमधील मनुष्य व वित्तहानी लक्षात घेता, शांतता प्रस्थापित करण्यासाठी ठोस प्रयत्न केले पाहिजेत, असे जगातील सर्वच देशांना वाटू लागले. पहिल्या महायुद्धानंतर शांतता प्रस्थापित करण्यासाठी निर्माण केलेल्या राष्ट्रसंघाला यात फारसे यश आले नाही. दुसऱ्या महायुद्धानंतर मात्र विनाशकारी युद्धे थांबली पाहिजेत, हा विचार बळावला आणि 'संयुक्त राष्ट्रे' ही आंतरराष्ट्रीय संघटना २४ ऑक्टोबर १९४५ रोजी स्थापन झाली. म्हणून २४ ऑक्टोबर हा दिवस 'संयुक्त राष्ट्र दिन' म्हणून साजरा केला जातो. जागतिक शांतता टिकवण्याची जबाबदारी एक-दोन राष्ट्रांची नसते. सर्वच राष्ट्रांना या जबाबदारीची जाणीव असली पाहिजे. संयुक्त राष्ट्रे ही अशी जाणीव निर्माण करणारी संघटना आहे.

संयुक्त राष्ट्रांचे बोधचिन्ह

संयुक्त राष्ट्रांची सनद ज्यांना मान्य आहे, अशा सर्व राष्ट्रांना संयुक्त राष्ट्रांचे सभासद होता येते. ही आंतरराष्ट्रीय संघटना काही

महत्त्वाच्या तत्वांवर आधारलेली आहे. ती सार्वभौम राष्ट्रांची संघटना आहे. आंतरराष्ट्रीय प्रश्न शांततेच्या मार्गाने सोडवण्याचे ते एक व्यासपीठ आहे. या संघटनेतील सर्व सदस्य राष्ट्रांना समान दर्जा असतो. विकसित-अविकसित, गरीब-श्रीमंत असा भेद न करता सर्व राष्ट्रांना समान मानले जाते. सभासद राष्ट्रांनी आपले आंतरराष्ट्रीय प्रश्न शांततामय मार्गांनीच सोडवावे, असे सभासद राष्ट्रांवर बंधन आहे.

**उद्‌दिष्टे :** संयुक्त राष्ट्रे या संघटनेची काही निश्चित उद्‌दिष्टे आहेत. ती पुढीलप्रमाणे -

(१) आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता वृद्‌धिंगत करणे.

(२) राष्ट्राराष्ट्रांमध्ये मैत्रीपूर्ण संबंध विकसित करणे.

(३) सर्व प्रकारचे आंतरराष्ट्रीय प्रश्न शांततेच्या मार्गाने सोडवणे.

(४) मानवी हक्कांचे, स्वातंत्र्याचे जतन व संवर्धन करणे.

वरील उद्‌दिष्टांच्या पूर्ततेसाठी विविध देशांच्या कार्यामध्ये समन्वय साधण्याचे काम 'संयुक्त राष्ट्रे' ही संघटना करते.

**संयुक्त राष्ट्रे :** संयुक्त राष्ट्रांचे सहा प्रमुख घटक पुढीलप्रमाणे-

(१) आमसभा (२) सुरक्षा परिषद (३) आर्थिक आणि सामाजिक परिषद (४) आंतरराष्ट्रीय न्यायालय (५) विश्वस्त मंडळ (६) सचिवालय.

संयुक्त राष्ट्रांचे मुख्यालय न्यूयॉर्कमध्ये आहे. येथे आंतरराष्ट्रीय न्यायालय वगळता इतर सर्व घटकांची मुख्य कार्यालये आहेत. आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे कार्यालय नेदरलँडमधील 'द हेग' या शहरात आहे.

## १. आमसभा

**रचना :** संयुक्त राष्ट्रांच्या सर्व सभासद राष्ट्रांचे प्रतिनिधी

आमसभेचे सभासद असतात. इ. स. २००६ पर्यंत आमसभेतील सदस्य राष्ट्रांची संख्या १९२ होती. आमसभेत मतदान करताना प्रत्येक राष्ट्राला एकच मत देण्याचा अधिकार असतो. श्रीमती विजयालक्ष्मी पंडित यांनी १९५३ साली संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेचे अध्यक्षपद भूषवले होते. हे पद भूषवणाऱ्या त्या पहिल्या भारतीय महिला होत्या.



आमसभा

**कार्ये :** आमसभेला आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षिततेच्या प्रश्नांसंबंधीचे ठराव मांडण्याचा अधिकार आहे. सुरक्षा परिषदेकडून आलेल्या अहवालांवर विचारविनिमय करणे, संयुक्त राष्ट्रांचे अंदाजपत्रक संमत करणे इत्यादी कामे आमसभा करते. तसेच सुरक्षा परिषदेचे अस्थायी सभासद, सामाजिक व आर्थिक परिषदेचे सभासद यांची निवड आमसभेकडून होते. अधिवेशनकाळात अनेक महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय प्रश्नांवर सर्व सभासद राष्ट्रे चर्चा करतात, म्हणून आमसभा हे

आंतरराष्ट्रीय प्रश्नांच्या चर्चेचे महत्त्वाचे व्यासपीठ मानले जाते.

## २. सुरक्षा परिषद

**रचना** : सुरक्षा परिषदेत एकूण पंधरा सभासद राष्ट्रे असतात. अमेरिका, फ्रान्स, इंग्लंड, रशिया व चीन ही पाच राष्ट्रे सुरक्षा परिषदेची स्थायी सभासद आहेत. दहा अस्थायी सभासद राष्ट्रांची निवड इतर सदस्य राष्ट्रांमधून दोन वर्षांसाठी केली जाते. सुरक्षा परिषदेच्या पाच स्थायी सभासदांना नकाराधिकार असतो. स्थायी सभासद राष्ट्रांच्या संमती नाकारण्याच्या अधिकाराला नकाराधिकार म्हणतात. कोणत्याही निर्णयात या पाच राष्ट्रांचा होकार असावा लागतो. यांपैकी एकाही राष्ट्राने संमती न दिल्यास निर्णय फेटाळला जातो.

**कार्ये** : जागतिक शांतता व सुरक्षिततेची जोपासना करणे, वादग्रस्त आंतरराष्ट्रीय प्रश्नांची चौकशी करणे, आंतरराष्ट्रीय वाद सोडवण्याच्या दृष्टीने उपाय सुचवणे, गरज भासल्यास आक्रमक देशांविरुद्ध आर्थिक किंवा लष्करी कारवाई करणे इत्यादी कामे सुरक्षा परिषद पार पाडते.

## ३. आर्थिक आणि सामाजिक परिषद

**रचना** : संयुक्त राष्ट्रांच्या आर्थिक व सामाजिक कार्यामध्ये समन्वय साधण्यासाठी या परिषदेची स्थापना करण्यात आली. या परिषदेत एकूण ५४ सभासद असतात.

**कार्ये** : दारिद्र्य, आर्थिक व सामाजिक विषमता, वर्णभेद अशा प्रश्नांची जागतिक पातळीवर चर्चा करणे, मानवी स्वातंत्र्य व मानवी हक्कांच्या संदर्भात जागृती करणे, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक प्रश्नांसंबंधीचे विविध प्रकल्प हाती घेणे ही या परिषदेची कार्ये आहेत.

## ४. आंतरराष्ट्रीय न्यायालय

**रचना** :आंतरराष्ट्रीय न्यायालयात एकूण पंधरा न्यायाधीश असतात. आंतरराष्ट्रीय न्यायालयाच्या न्यायाधीशांची निवड सुरक्षा परिषद व आमसभा करते.



आंतरराष्ट्रीय न्यायालय

**कार्ये** : संयुक्त राष्ट्रांचे सभासद असलेल्या दोन किंवा अधिक राष्ट्रांमधील तंटे सोडवणे, आंतरराष्ट्रीय कायदे, संकेत, परंपरा यांचा योग्य अर्थ लावणे इत्यादी कामे आंतरराष्ट्रीय न्यायालय करते.

**५. विश्वस्त मंडळ** : दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात जे प्रदेश स्वत:चे शासन करण्यास असमर्थ होते, त्यांची जबाबदारी विश्वस्त मंडळावर होती. या प्रदेशातील लोकांना स्वत:चे शासन चालवण्यास समर्थ

करणे, हा या मंडळाचा हेतू होता. १९९४ पर्यंत अशा प्रदेशांना संयुक्त राष्ट्रांनी मदत केली. प्रशांत महासागरातील पलाऊ बेटांना स्वातंत्र्य मिळाल्यानंतर विश्वस्त मंडळ १ नोव्हेंबर १९९४ रोजी बरखास्त झाले.

## ६. सचिवालय

**रचना :** संयुक्त राष्ट्रांचे प्रशासकीय कार्य सांभाळण्यासाठी सचिवालयाची निर्मिती झाली. सचिवालयाच्या प्रमुखास संयुक्त राष्ट्रांचा 'सरचिटणीस' असे म्हणतात. आमसभा व सुरक्षा परिषद मिळून पाच वर्षांच्या कालावधीसाठी सरचिटणिसाची निवड करतात.

**कार्ये :** आमसभेच्या तसेच सुरक्षा परिषदेच्या बैठका आयोजित करणे, जागतिक प्रश्नांवर आंतरराष्ट्रीय परिषदा भरवणे, मानवी हक्कांचे संरक्षण व नि:शस्त्रीकरण यांसारख्या विषयांचा अभ्यास करणे, संयुक्त राष्ट्रांचे कार्यालयीन दस्तऐवज सांभाळणे इत्यादी कामे सचिवालय सरचिटणिसाच्या मार्गदर्शनाखाली पार पाडते.

या सहा प्रमुख घटकांशिवाय संयुक्त राष्ट्रांच्या अनेक संलग्न संस्था सामाजिक, आर्थिक विकासाच्या कामात गुंतलेल्या आहेत. त्यांतील काही संस्थांचा थोडक्यात परिचय पुढीलप्रमाणे -

आंतरराष्ट्रीय कामगार संघटना : बोधचिन्ह

**आंतरराष्ट्रीय कामगार संघटना (जिनिव्हा) :** कामगारांच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणणे, त्यांना योग्य वेतन मिळावे, त्यांच्या आरोग्याचे रक्षण व्हावे म्हणून प्रयत्न करणे इत्यादी कामे ही संघटना करते.

**अन्न व शेती संघटना (रोम) :** जगातील गरिबी, कुपोषण व

भूकबळी यांसारख्या समस्या सोडवणे, शेतीचे उत्पन्न वाढवण्यासाठी मार्गदर्शन करणे ही कामे या संघटनेची आहेत.

अन्न व शेती संघटना : बोधचिन्ह

शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघटना : बोधचिन्ह

**शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघटना (पॅरिस) :** विविध राष्ट्रांमधील शिक्षण, विज्ञान व संस्कृती इत्यादी क्षेत्रांतील देवाण-घेवाण वाढवणे हे या संघटनेचे मुख्य काम आहे. जगातील निरक्षरता कमी करण्याचा प्रयत्न ही संघटना करते.

**जागतिक आरोग्य संघटना (जिनिव्हा) :** जगातील सर्व लोकांच्या शारीरिक व मानसिक स्थितीत सुधारणा करणे, संसर्गजन्य रोगांना आळा घालणे, त्यासाठी लसीकरणाची मोहीम हाती घेणे इत्यादी कामे ही संघटना पार पाडते.

जागतिक आरोग्य संघटना : बोधचिन्ह

आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा आयोग: बोधचिन्ह

**आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा आयोग (व्हिएन्ना) :** नागरी अणुशक्तीचा वापर लष्करी कारणासाठी केला जाणार नाही, यावर लक्ष ठेवणे, त्यासाठी विविध देशांतील अणुशक्ती केंद्रांना प्रत्यक्ष भेट देऊन तपासणी

करणे अशी महत्त्वाची कार्ये या आयोगाला पार पाडावी लागतात.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी कंसातील योग्य पर्याय लिहा.**

(अ) संयुक्त राष्ट्रे ही संघटना.......रोजी स्थापन झाली.

(२४ ऑक्टोबर १९४५, १४ ऑक्टोबर १९४५, ४ ऑक्टोबर १९४५)

(आ) संयुक्त राष्ट्रांच्या सर्व सभासद राष्ट्रांचे प्रतिनिधी.......सभासद असतात.

(सुरक्षा परिषदेचे, आमसभेचे, विश्वस्त मंडळाचे)

२. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) संयुक्त राष्ट्रांच्या सभासद राष्ट्रांवर कोणते बंधन आहे?

(आ) सुरक्षा परिषदेची स्थायी सभासद राष्ट्रे कोणती आहेत?

(इ) आर्थिक आणि सामाजिक परिषदेची स्थापना का करण्यात आली?

३. **दोन-तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) नकाराधिकार म्हणजे काय?

(आ) आंतरराष्ट्रीय न्यायालय कोणते काम करते?

(इ) सुरक्षा परिषद कोणती कामे पार पाडते?

४. **चार-पाच वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) संयुक्त राष्ट्रे या संघटनेची उद्दिष्टे कोणती आहेत?

(आ) आमसभा कोणती कामे करते?

(इ) आर्थिक आणि सामाजिक परिषदेची कामे कोणती आहेत?

**उपक्रम**

संयुक्त राष्ट्रांनी जाहीर केलेले महत्त्वाचे 'जागतिक दिन' शोधा. त्या त्या दिवशी शाळेत कार्यक्रम आयोजित करा.

# ५. संयुक्त राष्ट्रे : कार्य

मागील पाठात आपण संयुक्त राष्ट्रे या संघटनेची ओळख करून घेतली. जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी ही संघटना कोणते मार्ग अवलंबते याचा अभ्यास आपण या पाठात करणार आहोत. तसेच संयुक्त राष्ट्रांची कामगिरी आणि त्यातील भारताचा सहभाग जाणून घेणार आहोत.

आंतरराष्ट्रीय संघर्ष सोडवण्याचे जे प्रमुख मार्ग आहेत, त्यांचा उल्लेख संयुक्त राष्ट्रांच्या सनदेत आहे. त्यानुसार पुढील दोन मार्गांनी आंतरराष्ट्रीय संघर्ष, वाद व तंटे सोडवता येतात.

**१. शांततामय मार्ग :** संयुक्त राष्ट्रांचा शांततामय मार्गाने संघर्ष सोडवण्यावर विशेष भर असतो. ज्या राष्ट्रांमध्ये वाद किंवा तंटे असतात, त्यांनी आपले प्रश्न वाटाघाटी, मध्यस्थी, सामंजस्य या मार्गांनी सोडवावे अशी संयुक्त राष्ट्रांची अपेक्षा असते.

**२. प्रत्यक्ष कारवाईचा मार्ग :** शांततामय मार्गांनी प्रश्न न सुटल्यास संयुक्त राष्ट्रे प्रत्यक्ष कारवाईच्या मार्गांचा अवलंब करतात. यांत आक्रमक राष्ट्रांविरुद्‌ध आपल्या सदस्य राष्ट्रांच्या शांतिसेनेचा वापर केला जातो. संयुक्त राष्ट्रांची ही प्रत्यक्ष कारवाई मानवतावादी भूमिकेतून केली जाते. असा मानवतावादी हस्तक्षेप करून संयुक्त राष्ट्रांनी कोरिया, कांगो, व सोमालिया इत्यादी राष्ट्रांशी संबंधित प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला आहे.

जगातील युद्‌धे रोखण्यात संयुक्त राष्ट्रांना पूर्णत: यश आलेले नसले, तरी या संघटनेने मानवाचा विकास व्हावा, शांततेची हमी देणारी परिस्थिती निर्माण व्हावी म्हणून बरेच प्रयत्न केले आहेत. संयुक्त राष्ट्रांनी

पर्यावरण रक्षण, बालकांचे हक्क, महिला सबलीकरण इत्यादी क्षेत्रांत मोलाची कामगिरी केली आहे.

**संयुक्त राष्ट्रे व पर्यावरणाची समस्या** : जागतिक पातळीवर होणारा पर्यावरणाचा ऱ्हास ही एक गंभीर समस्या आहे. संयुक्त राष्ट्रांनी पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी अनेक महत्त्वाच्या उपाययोजना केल्या आहेत. या प्रश्नांचे गांभीर्य सर्व राष्ट्रांना कळावे, त्यांच्यात चर्चा व्हावी व सहकार्याने हा प्रश्न सोडवता यावा, म्हणून काही महत्त्वाच्या परिषदांचे आयोजन संयुक्त राष्ट्रांनी केले. सन १९७२ मध्ये स्टॉकहोम (स्वीडन) येथे परिषद भरवली गेली. त्यातून संयुक्त राष्ट्रांचा पर्यावरण कार्यक्रम



पर्यावरण रक्षण

निश्चित झाला. त्यानंतर विकास व पर्यावरण यावर एक जागतिक आयोग नेमण्यात आला. त्यातून शाश्वत विकासाची (Sustainable development) संकल्पना पुढे आली. १९९२ मध्ये वसुंधरा परिषदेचे आयोजन हा पर्यावरण रक्षणाच्या प्रयत्नांतील आणखी एक महत्त्वाचा टप्पा होता. जागतिक तापमानात वाढ, ओझोन थर विरळ होणे, वनांचे व इतर नैसर्गिक साधनसंपत्तीचे रक्षण, जैवविविधतेचे रक्षण आणि प्रदूषणावर नियंत्रण इत्यादी प्रश्नांवर या परिषदेत चर्चा करण्यात आली.

इ.स. १९९७ मध्ये पर्यावरणाशी संबंधित एक आंतरराष्ट्रीय करार करण्यात आला. तो 'क्योटो प्रोटोकोल' म्हणून ओळखला जातो. भारताने २००२ साली हा करार स्वीकारला. तसेच पर्यावरणाच्या संवर्धनासाठी जागतिक पातळीवर होणाऱ्या सर्व प्रयत्नांमध्ये भारताने सहभाग घेतला आहे. भारताने आपली आर्थिक, औद्योगिक, व्यापार-विषयक व अन्य प्रकारची धोरणे ठरवताना पर्यावरण रक्षणाच्या प्रश्नाला प्राधान्य दिले आहे.

**संयुक्त राष्ट्रे व महिला सबलीकरण :** संयुक्त राष्ट्रांनी स्त्रियांच्या सबलीकरणास आणि स्त्री-पुरुष समानतेच्या विचारास पाठिंबा दिला आहे. स्त्रियांच्या प्रश्नांकडे सर्व जगाचे लक्ष वेधण्यासाठी व त्यावर उपाययोजना करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांनी ८ मार्च हा दिवस 'आंतरराष्ट्रीय महिला दिन' म्हणून घोषित केला आहे. १९७५ साल हे 'महिला वर्ष' म्हणून घोषित केले होते. इतकेच नव्हे, तर १९७६ ते १९८५ हे संपूर्ण दशक महिलांसाठीचे दशक म्हणून जाहीर केले होते. या संघटनेने जगभरच्या महिलांच्या विकासासाठी स्वतंत्र निधी आणि प्रशिक्षण संस्था निर्माण केल्या आहेत. महिलांच्या विविध प्रश्नांशी संबंधित माहितीचे संकलन करून त्या आधारे महत्त्वाचे निर्णय घेण्याचे व ते राबवण्याचे कार्य संयुक्त राष्ट्रे करतात.

**संयुक्त राष्ट्रांच्या कार्यात भारताचा सहभाग :** भारत हा संयुक्त राष्ट्रांचा संस्थापक सदस्य आहे. संघटनेची सर्व ध्येये व उद्दिष्टे भारताने स्वीकारलेली आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या शांतता कार्यात भारताचा अत्यंत महत्त्वपूर्ण सहभाग आहे. अलीकडच्या काळात सोमालिया या देशात भारतीय शांतिसेनेच्या पथकाने विहिरी खणणे, पाणीपुरवठा करणे, शाळा चालवणे, आरोग्यसेवा पुरवणे इत्यादी कामे केली आहेत. भारतीय शांतिसेनेचे हे अभिमानास्पद कार्य आहे.

**नि:शस्त्रीकरण :** आर्थिक भरभराट, समृद्धी आणि विकासाचा वेग कायम राखण्यासाठी देशात स्थैर्य आणि शांतता आवश्यक असते. त्यासाठी निःशस्त्रीकरण ही महत्त्वाची बाब ठरते.

जागतिक शांततेचे प्रयत्न होत असतानाच काही राष्ट्रे शस्त्रस्पर्धा वाढवण्यावर भर देताना दिसतात. शस्त्रास्त्र स्पर्धेमुळे राष्ट्राराष्ट्रांमधील संबंधांत अविश्वासाचे व संशयाचे वातावरण निर्माण होऊ शकते. शस्त्रेच नष्ट केली, त्यांचे उत्पादन थांबवले किंवा त्यांच्या वापरावर मर्यादा घातल्या, तर जागतिक शांतता प्रस्थापित होऊ शकेल हा विचार म्हणजे निःशस्त्रीकरण होय. १९५९ साली संयुक्त राष्ट्रांनी सार्वत्रिक व पूर्ण निःशस्त्रीकरण हे आपले ध्येय म्हणून स्वीकारले आहे.

**भारताचे नि:शस्त्रीकरणाचे धोरण :** भारताने निःशस्त्रीकरणाला पाठिंबा दिला असून संयुक्त राष्ट्रांच्या निःशस्त्रीकरणाच्या प्रयत्नास नेहमीच प्रतिसाद दिला आहे. जगापुढे अण्वस्त्र युद्धाचा धोका असल्याने भारताचा अण्वस्त्रांना तत्त्वत: विरोध आहे. जागतिक पातळीवरील आण्विक नि:शस्त्रीकरणाच्या धोरणाला भारताचा पाठिंबा आहे. आण्विक शस्त्रांचा वापर प्रथम करणार नाही, हे भारताच्या आण्विक धोरणाचे सर्वांत महत्त्वाचे तत्त्व आहे.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी कंसातील योग्य पर्याय लिहा.**

(अ) संयुक्त राष्ट्रांचा ....... मार्गाने संघर्ष सोडवण्यावर विशेष भर असतो.
(युद्धाच्या, शांततामय, दबावाच्या)

(आ) संयुक्त राष्ट्रांनी ८ मार्च हा दिवस आंतरराष्ट्रीय ............म्हणून घोषित केला आहे.
(महिला दिन, बालक दिन, पर्यावरण दिन)

(इ) संयुक्त राष्ट्रांनी १९७५ साल हे ....... वर्ष म्हणून घोषित केले होते.
(बालक, पुरुष, महिला)

२. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) राष्ट्रांमधील वाद व तंटे कोणत्या मार्गांनी सोडवावे, अशी संयुक्त राष्ट्रांची अपेक्षा असते ?

(आ) संयुक्त राष्ट्रे प्रत्यक्ष कारवाईच्या मार्गाचा अवलंब केव्हा करतात ?

(इ) भारतीय शांतिसेनेच्या पथकाने सोमालिया या देशात कोणती कामगिरी केली ?

३. **तीन-चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) १९९२ मध्ये आयोजित केलेल्या वसुंधरा परिषदेत कोणत्या प्रश्नांवर चर्चा करण्यात आली ?

(आ) संयुक्त राष्ट्रांनी आंतरराष्ट्रीय महिला दिन का घोषित केला ?

(इ) निःशस्त्रीकरण म्हणजे काय ?

### उपक्रम

(अ) तुमच्या वर्गात पर्यावरण मंडळ स्थापन करून पर्यावरणाविषयीच्या विविध कार्यक्रमांचे आयोजन करा.

(आ) वर्तमानपत्रांत पर्यावरणाच्या संदर्भात आलेल्या बातम्यांचे वर्गात वाचन करा व त्यांवर चर्चा करा.

# ६. आंतरराष्ट्रीय सहकार्य व विकास

संयुक्त राष्ट्रे या आंतरराष्ट्रीय संघटनेच्या कामगिरीची माहिती मागील पाठात आपण करून घेतली. या पाठात आपण आंतरराष्ट्रीय सहकार्य व विकास यांची माहिती घेणार आहोत. जागतिकीकरणामुळे आंतरराष्ट्रीय सहकार्य व विकासाचे स्वरूप खूप बदलले आहे,म्हणून जागतिकीकरणाचा अर्थ व परिणाम यांचाही अभ्यास आपण करणार आहोत.

**आंतरराष्ट्रीय सहकार्याचे महत्त्व :** विविध राष्ट्रे परस्परांशी आर्थिक, व्यापारी, सांस्कृतिक, विज्ञान, तंत्रज्ञान इत्यादी क्षेत्रांत देवाणघेवाण करतात. या देवघेवीला 'आंतरराष्ट्रीय सहकार्य' म्हटले जाते. अशा देवाणघेवाणीचा हेतू एकमेकांना मदत करण्याचा व त्याद्वारे आपला विकास साधण्याचा असतो. विकास हे सर्वच राष्ट्रांचे एक समान उद्दिष्ट असल्याने आंतरराष्ट्रीय सहकार्य करण्यात सर्व देश पुढाकार घेतात. आंतरराष्ट्रीय सहकार्यामुळे गरीब व श्रीमंत राष्ट्रे यांच्यातील दरी कमी करता येणे शक्य होते. आंतरराष्ट्रीय सहकार्याला जागतिकीकरणामुळे चालना मिळाली. त्यामुळे आंतरराष्ट्रीय सहकार्याची व्याप्ती वाढली.

**गरीब व श्रीमंत राष्ट्रे :** ज्या देशांचे दरडोई उत्पन्न जास्त असते, जेथे भरीव औद्योगिक प्रगती झालेली असते आणि साक्षरतेचे प्रमाणही अधिक असते, अशा देशांना श्रीमंत देश म्हटले जाते. श्रीमंत देशांचे मानवी विकास निर्देशांकात बरेच वरचे स्थान असते.

गरीब देश नैसर्गिक साधनसंपत्तीने संपन्न असू शकतात, मात्र अशा राष्ट्रांकडे भौतिक आणि तांत्रिक साधने कमी असल्यामुळे त्यांना

आपली नैसर्गिक साधनसंपत्ती आर्थिक विकासासाठी उपयोगात आणता येत नाही. शेतीप्रधान अर्थव्यवस्था, उद्योगीकरणाचा मंद वेग, साक्षरतेचे कमी प्रमाण इत्यादी बाबी गरीब राष्ट्रांमध्ये दिसून येतात. मानवी विकास निर्देशांकात गरीब राष्ट्रांचे स्थान निम्नस्तरावर दिसून येते. दारिद्र्य, बेरोजगारी, सामाजिक मागासलेपणा आणि राजकीय अस्थिरता या समस्या सोडवण्यासाठी गरीब राष्ट्रांना विशेष प्रयत्न करावे लागतात.

**जागतिकीकरण** : विविध देशांमध्ये माहिती तंत्रज्ञान, भांडवल, लोक, बाजारपेठा, वस्तू यांचा मुक्त संचार आणि देवाणघेवाण म्हणजे जागतिकीकरण होय. जागतिकीकरणामुळे देशोदेशींच्या अर्थव्यवस्था व बाजारपेठा परस्परांशी जोडल्या गेल्या आहेत.




जागतिकीकरण : मुक्त संचार

इ.स.१९९० नंतरच्या काळात जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला वेग आला. देशांच्या सीमांपलीकडे असणाऱ्या जगाच्या विविध भागांत राहणाऱ्या लोकांमधील संपर्क वाढला. त्यांच्यातील वैचारिक देवाण-घेवाण वाढली. भांडवल, कुशल-अकुशल मनुष्यबळ इत्यादींचा ओघ जगभरात कोठेही नेता येणे शक्य झाले. वस्तूंचे उत्पादन सोईचे व किफायतशीर जेथे होईल तेथे करावे, जेथून मिळेल तेथून मनुष्यबळ घ्यावे व जगाच्या बाजारपेठेत कोठेही आपल्या मालाची विक्री करावी, अशा स्वरूपाचा जो बदल झाला तो जागतिकीकरणामुळे झाला आहे. जागतिकीकरणाला प्रामुख्याने आर्थिक संदर्भ असला, तरी राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक असे याचे विविध पैलू आहेत. जागतिकीकरणामुळे सर्व देशांच्या आर्थिक व परराष्ट्र धोरणात बदल झाले आहेत.

**व्यापार** : जागतिकीकरणामुळे अर्थव्यवस्थांचे एकात्मीकरण होऊ लागले. भारताने या प्रक्रियेला सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. जागतिक व्यापार हा आंतरराष्ट्रीय सहकार्य जोपासण्याचा एक महत्त्वाचा मार्ग आहे, हे जाणून भारताने १९९० नंतरच्या काळात अनेक आर्थिक सुधारणा केल्या. आपल्या देशाची बाजारपेठ इतर देशांसाठी खुली केली. व्यापारावरील निर्बंध दूर केले. प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील व्यापारी संघटनांमध्ये प्रवेश केला.

जागतिक व्यापारासंबंधी नियम तयार करण्यासाठी १९९५ मध्ये 'जागतिक व्यापार संघटनेची' स्थापना झाली. भारताने या संघटनेचे सभासदत्व स्वीकारले आहे. या संघटनेत जागतिक व्यापारासंबंधी वाटाघाटी आणि चर्चा होतात. त्यांतून जागतिक व्यापारी धोरण ठरवले जाते. हे धोरण विकसनशील देशांच्या दृष्टीने फायद्याचे व्हावे यासाठी भारत सातत्याने प्रयत्न करत आहे.

**तंत्रज्ञान :** तंत्रज्ञानातील बदलांमुळे देशांमधील व देशांतर्गत भौगोलिक अंतर कमी झाले आहे. कमी वेळात जगात कोठेही संपर्क साधणे शक्य झाले. इलेक्ट्रॉनिक्स माध्यमातून पैशाची गुंतवणूक आणि देवाणघेवाण अशा बाबी अतिशय सोप्या झाल्या आहेत. तंत्रज्ञानातील प्रगतीचा एक महत्त्वाचा फायदा आरोग्याच्या क्षेत्रात दिसून येतो. वैद्यकीय क्षेत्रातील प्रगती, आरोग्यसेवेतील सुधारणा, जीवनाच्या गुणवत्तेतील वाढ, सरासरी आयुर्मानातील वाढ इत्यादींतून ती दिसून येते. ही देवाणघेवाण एकतर्फी नसून सर्वच राष्ट्रे या प्रक्रियेत आपला वाटा उचलतात. उदाहरणार्थ, भारतातील पारंपरिक ज्ञान, योगशास्त्र आणि आयुर्वेद यांचा जगभर प्रसार होत आहे.

**राजकीय व सामाजिक बदल :** जागतिकीकरणामुळे लोकशाहीकरणाच्या प्रक्रियेला चालना मिळाली. राज्यकारभार पारदर्शी असावा व प्रशासनात उत्तरदायित्व असावे, यांसाठी लोक आग्रही भूमिका घेत आहेत. हक्क व स्वातंत्र्यासाठी कोठेही केल्या जाणाऱ्या संघर्षाची माहिती आता सहजपणे सर्वत्र पोहोचत असल्यामुळे लोकांमधील जागरूकता वाढत आहे.

संगणक, इंटरनेट, ई–मेल, फॅक्स, भ्रमणध्वनी (मोबाइल) इत्यादींच्या दैनंदिन वापरामुळे लोकांचा परस्परांशी संपर्क वाढला. तंत्रज्ञानाच्या या सुविधांमुळे कला, साहित्य, संगीत, विज्ञान, क्रीडा, मनोरंजन, माहितीचे प्रसारण इत्यादी क्षेत्रांचा झपाट्याने विकास झाला.


बदलते जीवन

या सर्व बदलांचा परिणाम सामान्य माणसांच्या जगण्यावर आणि विचारांवर झाला आहे. जग एक आहे, अशी एक नवी जाणीव येत आहे आणि त्यातून एक नवी जागतिक संस्कृती निर्माण होत आहे.

या सर्व बाबी आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि विकासाला पोषक आहेत.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) आंतरराष्ट्रीय सहकार्याला ..............मुळे चालना मिळाली.

(आ) मानवी विकास निर्देशांकात.......राष्ट्रांचे स्थान निम्नस्तरावर दिसून येते.

(इ) जागतिकीकरणामुळे ............ एकात्मीकरण होऊ लागले.

२. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) राष्ट्रे परस्परांशी कोणकोणत्या क्षेत्रांत देवाणघेवाण करतात ?

(आ) गरीब राष्ट्रांना कोणत्या समस्या सोडवण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतात ?

(इ) जागतिकीकरण म्हणजे काय ?

३. **दोन-तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) भारताने १९९० नंतरच्या काळात कोणत्या आर्थिक सुधारणा केल्या ?

(आ) तंत्रज्ञानातील प्रगतीचा फायदा कोणकोणत्या क्षेत्रांत दिसून येतो ?

**उपक्रम**

'तंत्रज्ञानातील प्रगती व त्यातून होणारे फायदे-तोटे' यावर वर्गात चर्चासत्र आयोजित करा.

# ७. मानवी हक्क

जागतिक शांतता व सुरक्षितता प्रस्थापित करायच्या विविध मार्गांचा अभ्यास आपण या पूर्वीच्या पाठांत केला. या संदर्भातील आणखी एक मार्ग म्हणजे मानवी हक्कांची जोपासना होय. जगण्याचा आणि विकास साधण्याचा हक्क जगातल्या प्रत्येक व्यक्तीस आहे, ही कल्पना मानवी हक्कांचा आधार आहे.

जातीय दंगे, वांशिक संघर्ष आणि दहशतवादी कृत्यांमध्ये युद्धापेक्षा कितीतरी अधिक पटीने जीवित आणि वित्तहानी होते. महिला, मुले व काही वंचित समाजघटकांचे शोषणही मोठ्या प्रमाणावर होताना दिसते. जागतिक पातळीवर अशांतता निर्माण करण्यास या बाबी कारणीभूत ठरतात. मानवी हक्कांविषयी आपण उदासीन असल्यामुळे व याविषयीच्या अनास्थेमुळे जीवितहानीत वाढ होत आहे. जगातील दहशतवाद, शोषण व असुरक्षितता दूर करायची असेल, तर मानवी हक्कांविषयीची जागरूकता वाढली पाहिजे. मानवी हक्कांची जोपासना करण्यासाठी सर्वांनी ठोस प्रयत्न केले पाहिजेत.

**मानवी हक्क-स्वरूप आणि अर्थ :** धर्म, लिंग, जात, वंश, देश यांवर आधारित कोणतेच भेद न करता सन्मानाने जगण्याचा व आपला विकास साधण्याचा प्रत्येक व्यक्तीचा हक्क म्हणजे मानवी हक्क होय.

मानवी हक्क व्यक्तीला जन्मतःच प्राप्त होतात. कोणतेही शासन, संघटना किंवा अन्य व्यक्ती हे हक्क देत नाहीत, म्हणूनच ते हिरावून घेण्याचा अधिकार कोणालाही नसतो. मानवी हक्कांचे स्वरूप वैश्विक असते.

## काही महत्त्वाचे मानवी हक्क

**जीविताचा हक्क :** जीविताचा हक्क म्हणजे प्रत्येक व्यक्तीचा सन्मानाने जगण्याचा हक्क. सर्व मूलभूत गरजांची पूर्तता होणे आणि विकासास अनुकूल असलेल्या परिस्थितीत जगणे, म्हणजे सन्मानाने जगणे.

**विचार, अभिव्यक्ती, धर्म इत्यादींचे स्वातंत्र्य :** प्रत्येक व्यक्तीला विचार करण्याचे व ते व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे, तरच ती व्यक्ती आपला सर्वांगीण विकास साधू शकते. व्यक्ती विवेकशील आणि बुद्धिनिष्ठ असते, म्हणून विचार व अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य आवश्यक असते. धर्मस्वातंत्र्याचा हक्क हासुद्धा महत्त्वाचा मानवी हक्क आहे.

**राष्ट्रीयत्व प्राप्त करण्याचा हक्क :** एखाद्या व्यक्तीला त्याच्या देशात नागरिक म्हणून दर्जा प्राप्त करून घेण्याचा हक्क म्हणजे राष्ट्रीयत्वाचा हक्क होय. नागरिक या नात्याने व्यक्तीला मतदान करणे, निवडणूक लढवणे इत्यादी राजकीय हक्क प्राप्त होतात. देशाच्या कारभारात भाग घेण्याची संधी मिळते.

**अटक व स्थानबद्धतेपासून संरक्षण मिळवण्याचा हक्क :** कोणत्याही व्यक्तीला विनाकारण अटक करणे आणि डांबून ठेवणे हे मानवी हक्काच्या विरोधी आहे. या मानवी हक्काच्या जोपासनेसाठी प्रत्येक देशात योग्य अशी कायद्याची व न्यायदानाची पद्धती असावी लागते.

**शिक्षणाचा हक्क :** शिक्षणामुळे व्यक्तीचे अज्ञान दूर होते. विकासाच्या संधी प्राप्त होतात. अन्याय व जुलूम यांविरुद्ध संघर्ष करण्याची जाणीव निर्माण होते, म्हणूनच शिक्षणाचा हक्क हा एक

महत्त्वाचा मानवी हक्क आहे.

**मानवी हक्क आणि संयुक्त राष्ट्रे :** संयुक्त राष्ट्रांनी मानवी हक्कांना आपल्या उद्दिष्टांमध्ये अत्यंत महत्त्वाचे स्थान दिले आहे. मानवी हक्कांचा प्रचार आणि प्रसार हे त्यांतील एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

१० डिसेंबर १९४८ रोजी जाहीर झालेल्या संयुक्त राष्ट्रांच्या मानवी हक्कांच्या जाहीरनाम्याने मानवी हक्कांची मुहूर्तमेढ रोवली. या जाहीरनाम्यात एकूण ३० कलमे आहेत. त्यांपैकी काही महत्त्वाच्या कलमांतील तरतुदी पुढीलप्रमाणे. संयुक्त राष्ट्रांच्या सर्व सदस्य राष्ट्रांनी आपल्या देशातील लोकांना हे हक्क देणे अपेक्षित आहे.

(१) प्रत्येक व्यक्तीला तिचे लिंग, धर्म, वर्ण कोणतेही असले, तरी मानवी हक्क उपभोगण्याचा अधिकार आहे.
(२) प्रत्येक व्यक्तीला संचार स्वातंत्र्य आहे.
(३) व्यक्तीला आपल्या देशात जर असुरक्षित वाटत असेल, तर जगात कोठेही वास्तव्य करण्याचा अधिकार आहे.
(४) प्रत्येक व्यक्तीला अवैध अटकेपासून स्वातंत्र्य आहे.
(५) प्रत्येक व्यक्तीला मालमत्ता बाळगण्याचा अधिकार आहे.
(६) प्रत्येक व्यक्तीला विचाराचे व धार्मिक स्वातंत्र्य आहे.
(७) प्रत्येक व्यक्तीला संघटना स्वातंत्र्य आहे.
(८) प्रत्येक व्यक्तीला मत देण्याचा अधिकार आहे.
(९) काम करण्याचा व विश्रांतीचा हक्क सर्व स्त्री-पुरुषांना आहे.
(१०) प्राथमिक शिक्षणाचा, कला व साहित्याचा आस्वाद घेण्याचा हक्क आहे.
(११) प्रत्येक व्यक्तीला व्यवसाय स्वातंत्र्य आहे.
(१२) प्रत्येक व्यक्तीला आपले खासगी जीवन, पत व प्रतिष्ठा अबाधित ठेवण्याचा अधिकार आहे.

मानवी हक्कांची जोपासना करण्यासाठी व या हक्कांवरील अतिक्रमणे दूर करण्यासाठी संस्था व चळवळी सर्वत्र निर्माण झाल्या, तर मानवी हक्कांचे रक्षण अधिक परिणामकारक रीतीने होईल. या संदर्भात काही स्वयंसेवी संस्था आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्यरत आहेत. उदाहरणार्थ, ॲम्नेस्टी इंटरनॅशनल, ह्यूमन राईट्स वॉच इत्यादी.

**भारत आणि मानवी हक्क :** भारताच्या संविधानसभेचे कामकाज चालू असताना संयुक्त राष्ट्रांचा मानवी हक्क जाहीरनामा प्रसिद्ध झाला. या जाहीरनाम्यातील आशयाचा समावेश संविधानात करण्यात आला आहे. संविधानातील मूलभूत हक्क, तसेच मार्गदर्शक तत्त्वांमध्ये मानवी हक्कांचा समावेश केल्याचे दिसून येते.

मानवी हक्क आयोग : बोधचिन्ह

**राष्ट्रीय मानवी हक्क आयोग :** मानवी हक्कांचे संरक्षण व्हावे, म्हणून भारताने अनेक उपाययोजना केल्या आहेत. त्यांपैकी एक म्हणजे १९९३ साली केलेली राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाची स्थापना होय.

**रचना :** राष्ट्रीय मानवी हक्क आयोगात एक अध्यक्ष व अन्य सहा सदस्य असतात. आयोगाच्या अध्यक्षपदी सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशाची नियुक्ती केली जाते. सर्वोच्च न्यायालयाचे, उच्च न्यायालयाचे विद्यमान किंवा निवृत्त न्यायाधीश आयोगाचे सदस्य असतात. राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग आणि राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षांनाही राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाचे सभासदत्व दिले जाते. मानवी हक्क संरक्षणाच्या क्षेत्रात प्रत्यक्ष

कार्य केलेले दोन अनुभवी तज्ज्ञही आयोगाचे सभासद असतात.

**कामे :** मानवी हक्कांची देशात कोठेही पायमल्ली होत असल्यास त्याची चौकशी हा आयोग करतो. मानवी हक्कांचे संरक्षण करणे, हे या आयोगाचे महत्त्वाचे काम आहे.

महाराष्ट्र राज्यानेही मानवी हक्क आयोग स्थापन केला आहे.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) मानवी हक्क व्यक्तीला............प्राप्त होतात.

(आ) जीविताचा हक्क म्हणजे प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने........हक्क.

२. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) मानवी हक्कांविषयीची जागरूकता का वाढली पाहिजे ?

(आ) राष्ट्रीयत्वाचा हक्क म्हणजे काय ?

(इ) भारताने राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाची स्थापना का केली ?

३. **दोन-तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) मानवी हक्क म्हणजे काय?

(आ) मानवी हक्क हिरावून घेण्याचा अधिकार कोणालाच का नसतो?

४. **चार-पाच वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) संयुक्त राष्ट्रांच्या मानवी हक्कांच्या जाहीरनाम्यातील पाच कलमे लिहा.

(आ) भारतातील राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाची रचना लिहा.

### उपक्रम

(अ) संयुक्त राष्ट्रांचा मानवी हक्क जाहीरनामा ठळक अक्षरांत लिहून वर्गात लावा.

(आ) मानवी हक्कांचा भंग करणाऱ्या घटनांविषयी तुम्ही वर्तमानपत्रात वाचता. अशा कोणत्याही पाच घटनांची माहिती मिळवा व त्यात कोणत्या मानवी हक्कांचा भंग झाला आहे, हे शोधा.

# परिशिष्ट : स्पष्टीकरणात्मक टिपा

**अर्थव्यवस्थांचे एकात्मीकरण** : विविध देशांच्या अर्थव्यवस्था सुट्या किंवा अलग न राहता त्या परस्परांना जोडल्या जातात व परस्परांवर परिणाम करण्याची त्यांची क्षमताही वाढते. अर्थव्यवस्था एकजीव होण्याच्या प्रक्रियेला 'अर्थव्यवस्थांचे एकात्मीकरण' म्हणता येईल.

**अलिप्ततावादी चळवळ–निकष** : (१) अलिप्ततावाद स्वीकारलेल्या देशाने आपले परराष्ट्र धोरण स्वतंत्रपणे आखावे.

(२) वसाहतवाद व साम्राज्यवादास विरोध करावा.

(३) शीतयुद्धाच्या संदर्भात निर्माण झालेल्या लष्करी गटाचे सभासदत्व स्वीकारू नये.

(४) शीतयुद्धाच्या संदर्भात असणाऱ्या कोणत्याही महासत्तांबरोबर द्विपक्षीय करार केलेले असू नयेत.

(५) शीतयुद्धाच्या संदर्भात आपल्या प्रदेशाचा, अन्य कोणत्याही देशाला लष्करी तळ म्हणून वापर करू देऊ नये.

**आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रादेशिक संघटना** : जागतिक राजकारणामध्ये अनेक प्रादेशिक संघटना कार्यरत असतात. भौगोलिक समीपता, समान इतिहास, समान भौगोलिक वैशिष्ट्ये, आर्थिक समानता,

समान सांस्कृतिक वैशिष्ट्ये इत्यादी आधारांवर जगातील काही देश एकत्र येऊन संघटना स्थापन करतात. एकत्रितपणे आपापसातील समान समस्या सोडवण्याचा प्रयत्न करतात आणि विविध स्तरांवर परस्परांतील देवाणघेवाण वाढवतात. आज जगात युरोपीय संघ (EU), सार्क (SAARC), आसियान (ASEAN) अशा प्रादेशिक संघटना कार्यरत आहेत. या संघटना आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रांतील सहकार्याने सुरुवात करून हळूहळू राजकीय सामंजस्य वाढवण्याच्या दिशेने जात आहेत.

**जागतिक संस्कृती** : जागतिकीकरणाचा परिणाम विविध लोकसमूहांच्या सांस्कृतिक जीवनावरही झालेला आहे. आहार, पेहराव, संगीत, क्रीडा, मनोरंजन इत्यादी बाबतींत बदल होत आहेत. त्यातून नवी जीवनपद्धती आकारास येत आहे. या जीवनपद्धतीला ढोबळमानाने 'जागतिक संस्कृती' म्हणता येईल. अर्थात, असे घडत असताना जगातील सांस्कृतिक विविधता संपुष्टात आलेली नाही. आपली सांस्कृतिक अस्मिता आणि वेगळेपण जोपासण्याचा प्रयत्न अनेक लोकसमूह करत आहेत.

**दरडोई उत्पन्न** : देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नाला देशाच्या एकूण लोकसंख्येने भागल्यावर येणारी संख्या म्हणजे दरडोई उत्पन्न. यालाच

'दरमाणशी उत्पन्न किंवा सरासरी उत्पन्न' म्हणता येईल.

**दहशतवाद** : विशिष्ट राजकीय किंवा विशिष्ट विचारप्रणालीचा हेतू साध्य करण्यासाठी प्रत्यक्ष हिंसा किंवा हिंसेचा धाक दाखवून भीती उत्पन्न करण्याचे तंत्र म्हणजे दहशतवाद. महत्त्वाच्या व्यक्तींची हत्या, अपहरण, सार्वजनिक ठिकाणी बाँबस्फोट इत्यादी मार्ग वापरून जनतेमध्ये घबराट पसरवली जाते. ही पूर्णपणे अमानवी व लोकशाहीविरोधी कृती आहे.

**मानवी विकास निर्देशांक** : सरासरी आयुष्यमान, साक्षरतेचे प्रमाण, शिक्षणाचा प्रसार, आरोग्य सेवांची उपलब्धता, पाटबंधारे योजनांचा विकास, रोगराईचे निर्मूलन, रोजगाराची निर्मिती, पोषक आहाराच्या सेवनाचे प्रमाण, स्त्री-पुरुष प्रमाण, बालमृत्यू दर, कृषी व औद्योगिक विकास, रस्त्यांची लांबी आणि स्थानिक क्रयशक्ती इत्यादी निकषांच्या आधारे देशाच्या विकासाचे मोजमाप करणे म्हणजे मानवी विकास निर्देशांक निश्चित करणे. विकासाच्या मोजमापाची ही पद्धत संयुक्त राष्ट्रांच्या विकास प्रकल्पांतर्गत (१९९०) निर्माण करण्यात आली. तत्पूर्वी विकासाचे मोजमाप दरडोई उत्पन्नाच्या आधारे केले जात असे. मानवी हक्कांचे संरक्षण, लोकशाहीकरण, राजकीय संस्थांचे विकेंद्रीकरण, दुर्लक्षित समाज घटकांचा

विकास, पर्यावरण संरक्षण, सक्षमीकरण, कार्यक्षम प्रशासन, पारदर्शी व्यवहार इत्यादी निकषांचाही विकासाच्या निर्देशांकात समावेश व्हावा, असा एक मतप्रवाह आहे.

**मानवतावादी हस्तक्षेप** : कोणत्याही सार्वभौम राष्ट्राच्या अंतर्गत बाबींमध्ये ढवळाढवळ करणे गैर असते; परंतु काही वेळेस काही लोकसमूहांच्या सुरक्षिततेसाठी, त्यांचे संरक्षण करण्यासाठी संयुक्त राष्ट्रे हस्तक्षेप करते. त्याला 'मानवतावादी हस्तक्षेप' म्हणतात. या मानवतावादी हस्तक्षेपाचा हेतू शुद्ध असावा. न्याय्य कारणासाठीच तो केला जावा.

**लवाद** : एखादा संघर्ष सोडवण्यासाठी किंवा वादाच्या मुद्द्यांवर तोडगा काढण्यासाठी दोन्ही बाजूंना मान्य असणारी एक निःपक्षपाती यंत्रणा 'लवाद' म्हणून ओळखली जाते. हा उपाय म्हणजे एक प्रकारची न्यायालयीन प्रक्रिया आहे. देशांतर्गत आणि दोन देशांमधील वादविवाद सोडवण्यासाठीचा हा एक मान्यताप्राप्त उपाय आहे.

**वर्णभेद** : मानवाच्या शारीरिक वैशिष्ट्यांवरून म्हणजे त्वचेचा रंग, डोळ्यांचा आकार व शारीरिक ठेवण यांवर आधारित माणसांचे काही वांशिक गट कल्पिले आहेत. आपला वंश श्रेष्ठ मानून इतरांना वाईट किंवा दुय्यम वागणूक देण्याच्या प्रथेला

किंवा विचारसरणीला 'वर्णभेद' म्हणतात. वर्णभेद पूर्णतः अशास्त्रीय असून, वर्णभेद करणे म्हणजे मानवी हक्कांचा भंग करणे होय.

**शाश्वत विकास** : शाश्वत विकास म्हणजे पर्यावरणाचा ऱ्हास होऊ न देता साधला जाणारा विकास. नैसर्गिक साधनसंपत्ती भविष्यकाळातील पिढ्यांसाठी जतन करणे आवश्यक आहे, म्हणून सद्य:स्थितीत विकास करताना भविष्यकाळातील पिढ्यांना नैसर्गिक साधनसंपत्ती उपलब्ध होईल, अशा तऱ्हेने विकास केल्यास तो अधिक टिकाऊ स्वरूपाचा होतो.

**शांतिसेना** : जगातील कोणत्याही प्रदेशात शांतता प्रस्थापित करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांतर्फे पाठवल्या जाणाऱ्या पथकांना 'शांतिसेना' म्हणतात. शांतिसेनेत सदस्य राष्ट्रांच्या सैनिकांचा समावेश असतो. एखाद्या देशात सुरू असलेला संघर्ष मिटवून तेथे शांतता निर्माण करणे, तेथील जनतेला अन्नधान्य, आरोग्यसेवा पुरवणे इत्यादी कामे शांतिसेना करते. संबंधित प्रदेशात सुव्यवस्था व शांतता प्रस्थापित करून कायदेशीररीत्या नवीन शासनव्यवस्थेकडे कारभार येईपर्यंत शांतिसेनेचे तेथे वास्तव्य असते.

**शीतयुद्ध** : प्रत्यक्ष रणांगणावर युद्ध न करता दोन देशांमधील राजकीय, लष्करी व आर्थिक डावपेचांना शह-काटशह देऊन सतत

तणावाची आणि युद्धसदृश स्थिती ठेवणे, म्हणजे शीतयुद्ध होय. १९४५ नंतरच्या आंतरराष्ट्रीय राजकारणात शीतयुद्धाची सुरुवात अमेरिका व सोविएत युनियन या देशांच्या तणावपूर्ण संबंधांत होताना दिसते.

**संयुक्त राष्ट्रांची सनद** : संयुक्त राष्ट्रे या आंतरराष्ट्रीय संघटनेची उद्दिष्टे, संघटनेच्या शाखा व त्यांचे स्वरूप, तसेच शांतता रक्षणाविषयीची कार्यपद्धती स्पष्ट करणाऱ्या नियमावलीला 'संयुक्त राष्ट्रांची सनद' असे म्हटले जाते. ही सनद म्हणजे संयुक्त राष्ट्रांचे एक प्रकारचे संविधान आहे. यातील उद्दिष्टे व अन्य तरतुदी ज्या राष्ट्रांना मान्य आहेत, अशांना संयुक्त राष्ट्रांचे सदस्यत्व प्राप्त होते.

**सार्वभौमत्व** : देशाच्या अंतर्गत व परराष्ट्र धोरणाबाबत कोणत्याही दबावाशिवाय स्वतंत्रपणे निर्णय घेण्याचा देशाचा अधिकार म्हणजे सार्वभौमत्व होय. हा अधिकार अंतिम असून राज्यसंस्थेचे ते मूलभूत लक्षण आहे.

■■■

## जीवन-कौशल्ये शिक्षण (Life-skills Education)

जीवन जास्तीत जास्त कार्यक्षमतेने व यशस्वीपणे जगता यावे, यासाठी विद्यार्थ्यांची अंगभूत कौशल्ये विकसित करण्याचा सातत्यपूर्ण व सुसंगत प्रयत्न म्हणजे 'जीवन-कौशल्ये शिक्षण' होय. हे साध्य होण्यासाठी जीवनाच्या प्राथमिक टप्प्यात विद्यार्थ्यांना संधी पुरवणे नितान्त गरजेचे आहे. याखेरीज या शिक्षणातून विद्यार्थ्यांच्या भौतिक व मानसिक क्षमतांच्या जास्तीत जास्त उपयोगातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास घडवणे, हेही एक उद्दिष्ट आहे.

जागतिक आरोग्य संघटनेने (WHO) यासाठी पुढीलप्रमाणे दहा जीवन-कौशल्ये पुरस्कृत केली आहेत.

(१) **स्वजागृती** (Self awareness): स्वतःच्या क्षमता, मर्यादा, आवडीनिवडी, आकांक्षा ओळखण्याचे कौशल्य.

(२) **समानुभूती** (Empathy) : दुसऱ्याच्या भूमिकेत शिरून विचार करण्याचे कौशल्य.

(३) **समस्या निराकरण** (Problem solving) : उपलब्ध पर्यायांतून योग्य व संभाव्य पर्याय निवडून कार्यवाही करण्याचे कौशल्य.

(४) **निर्णय घेणे** (Decision making) : समस्या सोडवण्याच्या प्रक्रियेत अनेक पर्याय शोधून त्यांतील योग्य पर्याय स्वीकारण्याचे कौशल्य.

(५) **प्रभावी संप्रेषण** (Effective communication) : आपले विचार शाब्दिक किंवा अशाब्दिक माध्यमातून प्रभावीपणे व्यक्त करण्याचे कौशल्य.

(६) **चिकित्सक विचारप्रक्रिया** (Critical thinking) : उपलब्ध माहितीचे विश्लेषण व परीक्षण वस्तुनिष्ठपणे करण्याचे कौशल्य.

(७) **सर्जनशील विचारप्रक्रिया** (Creative thinking) : पारंपरिक व पुनरावृत्तीने आढळणाऱ्या पद्धतीपेक्षा वेगळ्या व अभिनव पद्धतीने एखाद्या समस्येबद्दल किंवा परिस्थितीबद्दल विचार करण्याचे कौशल्य.

(८) **आंतरव्यक्ती संबंध** (Interpersonal relations) : दैनंदिन जीवनात सतत संपर्कात असलेल्यांबरोबरचे संबंध ओळखून निर्मळ व स्नेहपूर्ण संबंध राखण्याचे कौशल्य.

(९) **भावनांचे समायोजन** (Coping with emotions) : आपल्या व इतरांच्या भावना, तसेच त्यांचे परिणाम ओळखून त्यावर नियंत्रण ठेवण्याचे कौशल्य.

(१०) **ताणतणावांचे समायोजन** (Coping with stress) : ताणतणावांची कारणे शोधून त्यांचे होणारे शारीरिक व मानसिक परिणाम लक्षात घेऊन त्यांचे व्यवस्थापन करण्याचे कौशल्य.

वर नमूद केलेली जीवन-कौशल्ये वर्गाध्यापनाच्या माध्यमातून साध्य करणे अपेक्षित आहे. नागरिकशास्त्र अध्यापनाची उद्दिष्टे व ही जीवन-कौशल्ये यांची योग्य सांगड घातल्यास वरीलपैकी बऱ्याच जीवन-कौशल्यांचा परिपोष विद्यार्थ्यांमध्ये करणे शक्य होईल.

## नागरिकशास्त्र इयत्ता आठवी : अभ्यासक्रमाची उद्दिष्टे

१. आंतरराष्ट्रीय शांतता व सामंजस्याचे आणि मानवी हक्कांचे महत्त्व ठसवणे.

२. नैसर्गिक व मानवनिर्मित पर्यावरण यांच्या सहसंबंधांविषयीच्या जाणिवा विकसित करणे.

३. लोकसंख्यावाढीमुळे निर्माण झालेल्या समस्यांची जाणीव विकसित करणे.


४. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे निर्माण झालेल्या आव्हानांना उचित प्रतिसाद देण्यास सक्षम बनवणे.

५. आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यास प्रवृत्त करणे.


विद्यार्थी ज्ञाननिर्माता (constructor of knowledge) व्हावा आणि त्याला पोषक अशी भूमिका (facilitator) शिक्षकाने वठवावी. यावर नव्या शैक्षणिक धोरणाचा भर आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना ज्ञानाच्या वाटा स्वतः शोधण्यास उत्तेजन द्यावे, विद्यार्थ्यांवर माहितीचा अवाजवी भार टाकू नये, त्यांच्या कल्पकतेला, निर्मितिक्षमतेला व कृतिशीलतेला उत्तेजन द्यावे अशी अपेक्षा आहे. नागरिकशास्त्राद्वारे विद्यार्थ्यांमध्ये नागरी जाणिवा (civic sense) आणि सामाजिक कर्तव्यभावना (sense of social responsibility) निर्माण झाल्या पाहिजेत. तसेच पर्यावरणाचे रक्षण करण्याची जबाबदारी उचलण्यासाठी विद्यार्थ्यांना सक्षम केले पाहिजे.

भारताचे परराष्ट्र धोरण व सुरक्षा व्यवस्था, संयुक्त राष्ट्रे, मानवी हक्क इत्यादी विषयांचा विद्यार्थ्यांना या पाठ्यपुस्तकातून प्रथमच परिचय होत आहे. आधुनिक काळात देशांतर्गत घडामोडींबरोबरच जगातील घडामोडींविषयी जाणिवा असणे फार महत्त्वाचे आहे. जबाबदार नागरिकत्वासाठी जागतिक शांतता, मानवी हक्क, शांततामय सहजीवन या मूल्यांची ओळख विद्यार्थ्यांना झाली पाहिजे. पाठ्यपुस्तकातील आशयाचा भर जागतिक शांतता व सुरक्षिततेचे संवर्धन व त्यातील भारताचे योगदान यांवर आहे. धर्मनिरपेक्षता, स्त्री-पुरुष समानता, सहभागातून विकास, पर्यावरण रक्षण, शांततामय सहजीवन ही मूल्ये या पाठ्यपुस्तकात अधोरेखित केली आहेत.

## या पाठ्यपुस्तकाच्या आधारे आंतरराष्ट्रीय घडामोडींच्या नोंदी करा.



लष्कराचे संचलन



महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

रु. ९.००